# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**

**No,CGRF/AZ/U / 185 / 2009 / 19 /** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

**Sub:- Forwarding of grievance in respect Shri Arun Baburao Jadhau , Tornaghad Housing Society, Police Colony,Padegaon, Aurangabad. Consumer No. 490011709696.**

**Dear Sir,**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Arun Baburao Jadhau , Tornagad Housing Society, Police Colony,Padegaon, Aurangabad.**

**You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with related documents.**

**The hearing in this matter is kept on 25/02/2009 at 14=00 Hrs.**

**Encl: As above**

**Member/Secretary**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

Copy to:-

**Shri Arun Baburao Jadhau ,**
**Tornaghad Housing Society,**
**Police Colony,**
**Padegaon,**
Aurangabad.

## ग्राहक गा-हाणे निवारण मंच

### महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
### औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८५/२००९/१९**

**तक्रार दाखल दिनांक :- १०/०२/२००९**
**निकाल दिनांक :- ०८/०४/२००९**

**श्री अरुण बाबुराव जाधव,**
**तोरणागड,हाऊसिंग सोसायटी,**
**पोलीस कॉलनी पडेगांव,**
**औरंगाबाद.**
**ग्राहक क्रमांक (४९००११७०९६९६) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर मंडल औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

## आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १०/०२/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २५/०२/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदारने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरावाठी वीज पुरवठा घेतला असुन महावितरण कंपनीतर्फे डिसेबर २००७ पर्यंत देण्यात आलेले वीज बिल त्यांनी नियमीतपणे भरले असल्याचे म्हटले आहे.जानेवारी २००८ मध्ये चुकीची मीटर रिडींग दाखवुन वाढीव वीज बिल आकारण्यात आले या चुकीच्या वीज बिलाबाबत त्यांनी छावणी उपविभागाकडे तक्रार दाखल केली पण त्यांच्या तक्रारीची दखल न घेण्यात आल्यामुळे त्यांनी ही तक्रार मंचात दाखल केली असुन महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल देण्याबाबत तसेच चुकीच्या वीज बिलापोटी वीज पुरवठा खंडीत करु नये आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक १०/०२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार उपस्थित नव्हते महावितरणचे नोडल अधिकारी यांनी छावणी उपविभागाकडुन या प्रकरणाची कागदपत्रे प्राप्त न झाल्यामुळे सुनावणीची तारीख पुढे वाढविण्याची विनंती केली मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करीत पुढील सुनावणी ०३/०३/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक ०३/०३/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार उपस्थित नव्हते. नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर यांनी अर्जदारच्या तक्रीवर आपला जवाब मंचात दाखल केला नाही व पुन्हा सुनावणीची तारीख पुढे वाढविण्याची विनंती केली मंचाने नोडल अधिकारी यांना जवाब दाखल करण्यासाठी शेवटची संधी देत पुढील सुनावणी ०७/०३/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

४) दिनांक ०७/०३/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार गैरहजर होते नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे सी.पी.एल.,बिल रिव्हीजन प्रस्ताव, स्थळपाहणी अहवाल मंचात दाखल केला.नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचा मीटर बदली अहवाल दाखल न केल्यामुळे मंचाने तो पुढील सुनावणीच्या वेळी दाखल करण्याचे आदेश देत पुढील सुनावणी १७/०३/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

५) दिनांक १७/०३/२००९ रोजी अर्जदार गैरहजर होते. अर्जदार सतत गैरहजर राहत असल्यामुळे मंचाने त्याच्याविरुध्द एकतर्फे सुनावणीचा आदेश पारीत केला. नोडल अधिकारी यांनी मीटर बदली अहवाल मंचात दाखल केला व अर्जदारास चुकीची मीटर रिडींग घेवुन देण्यात आलेल्या वीज बिलात रुपये २१६३५.०४ चे क्रेडीट देण्याची तयारी दर्शविली मंचाने नोडल अधिकारी यांचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवले.

६) अर्जदाराने तक्रारीसोबत दाखल केलेली कागदपत्रे तसेच नोडल अधिकारी यांनी दाखल केलेला जवाब,स्थळपाहणी अहवाल,मीटर बदली अहवाल, सी.पी.एल.चे निरिक्षण केल्यावर असे आढळुन येते की, महावितरणतर्फे अर्जदारास घरगुती वापरासाठी वीज पुरवठा देण्यात आला असुन वीज वापराच्या मोजणीसाठी १९७८९४ या क्रमांकाचे मीटर बसविण्यात आले होते. दिनांक २९/०९/२००७ रोजी अर्जदाराचे वरील क्रमांकाचे मीटर बदलुन त्याजागी ७४२७६३ या क्रमांकाचे मीटर लावण्यात आले पण महावितरणतर्फे अर्जदारास वीज बिल आकारतांना या नवीन वीज मीटरची नोंद घेतली न गेल्यामुळे त्यांना ऑक्टोबर २००७ नंतर मीटर घेणे स्टेटस दाखवत सरासरीवर आधारीत बिल आकारण्यात आले असल्याचे दिसुन येते जी चुकीचे असल्याचे स्पष्टपणे दिसुन येते. दिनांक ०५/०३/२००९ रोजी महाविरणतर्फे करण्यात आलेल्या स्थळपाहणी अहवालात दिनांक २९/०९/२००७ बसविण्यात आलेल्या मीटर क्रमांक ७४२७६३ वरील रिडींग ही २१४८ अशी असल्याचे नमुद केलेले दिसुन येते. यावरुन दिनांक २९/०९/२००७ ते दिनांक ५/०३/२००९ या काळात अर्जदाराचा एकुण वीज

वापर हा (२१४८-१) २१४७ युनीट असल्याचे स्पष्ट होते.ऑक्टोबर २००७ ते ०५/०३/२००९ पर्यंतचा (१७ महीने) कालावधी एकुण वीज वापर हा २१४७ अधिक १९८ बरोबर २३४५ असा (१३८युनीट/प्रतिमहा) दिसुन येतो, त्यामुळे नोडल अधिकारी यांनी २८२ युनीट प्रमाणे फक्त माहे जुन २००८ करीता दाखल केलेला वीज बिल दुरुती प्रस्ताव मान्य करता येत नाही.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरणतर्फे अर्जदारास ऑक्टोबर नंतर देण्यात आलेली सर्व वीज बिल रदद्‌ करण्यात येत आहे.

२) महावितरण कंपनीने अर्जदारास १३९ युनीट प्रतिमहा याप्रमाणे ऑक्टोबर २००७ व पुढील काळासाठी वीज बिल आकारणी करावी व त्यात कोणतेही व्याज व दंड आकारु नये.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८५/२००९/१९** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री अरुण बाबुराव जाधव,**
**तोरणागड,हाऊसिंग सोसायटी,**
**पोलीस कॉलनी पडेगांव,**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१८५/२००९/१९ )

आपण दिनांक १०/०२/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**